जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०१.०७.२०२५**

अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस शिताफीने अटक

फिर्यादी महिला, वय- ४३ वर्षे, धंदा- घरकाम, रा.सावरकरनगर, ठाणे. यांची अल्पवयीन मुलगी, वय १४ वर्षे ही दिनांक २९/०६/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास क्लास वरून घरी एकटी चालत येत असताना एका अनोळखी इसमाने त्याचे ताब्यातील लाल रंगाच्या कारने पीडीत मुलीचा एम.आर.आर. हॉस्पीटल ते शास्त्रीनगर असा पाठलाग करून गाडीमध्ये येण्याचा इशारा केला व थोडया वेळाने निघुन गेला असे पीडीत मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून वर्तकनगर पो स्टे गु.र.नं ५१४/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ७८(१),७८(२), सह पोस्को १२ प्रमाणे अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन श्री.राजकुमार वाघचवरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वर्तकनगर पो स्टे यांनी गुन्हा उघडकीस आणणेबाबत दिलेल्या सुचना प्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरीक्षक/विठ्ठल जे.चिंतामण व तपास पथक यांनी लागलीच घटनास्थळावरील व परीसरातील सीसीटीव्ही फुटेज बारकाईने पाहणी करून गुन्ह्यातील नमुद लाल रंगाच्या गाडीचा शोध घेवुन सदर गाडीचा नंबर प्राप्त केला. त्यानंतर आरोपी हा किसन नगर, नं ३, ठाणे पश्चिम या भागात असल्याचे समजल्याने सदर भागात शोध घेतला परंतु आरोपी बाहेर असल्याचे समजल्याने त्याचा मोबाईल नंबर प्राप्त करून तांत्रीक पध्दतीने शोध घेतला असता आरोपी हा कल्याण भागात असल्याने तात्काळ गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/चिंतामण व तपास पथक असे रवाना होवुन खडकपाडा, कल्याण येथे एका बार मधुन पळुन जाण्याच्या तयारीत असताना आरोपी नामे दिनेश विवेक घाग, रा.किसन नगर, ठाणे यास शिताफिने ताब्यात घेवुन सदर गुन्ह्यात अटक केली आहे. पिडीत मुलीचा व फिर्यादीचा जबाब नोंदविण्याची कारवाई पुर्ण करून सबळ पुराव्यानिशी आरोपीविरुध्द २४ तासाच्या आत मा.कोर्टात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

सदर उल्लेखनिय कामगीरी श्री.प्रशांत कदम, पोलीस उप आयुक्त,परिमंडळ - ५, सहाय्यक पोलीस आयुक्त वर्तकनगर विभाग, श्री.मंदार जवळे, यांचे मार्गदर्शनाखाली वर्तकनगर पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्री.राजकुमार वाघचवरे, पोलीस निरीक्षक(गुन्हे)/श्री.मल्हारी कोकरे, सपोनि/दिलीपकुमार वेडे, पोलीस उप निरीक्षक/विठ्ठल.जे.चिंतामण, पोहवा/जाधव, राठोड, झेमने, कांडेलकर, पोना/पाटोळे, पोशि/सौदागरे, पोशि/नागरे, पोशि/कात्राबाद यांनी केलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर